**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ९ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – गोविंद मुरलीधर बिराजदार,

वय – ५५ वर्षे, व्यवसाय– नोकरी(पोलिस उपनिरीक्षक),

राहणार – रेल्वे पोलिस स्टेशन, नांदेड, ता. जि. नांदेड.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एन. मेहेत्रे यांचे मार्फत सुरुः–**

१. मी सन २०१५ ते २०२० या कालावधीत औराद शहाजानी पो.स्टे. येथे पोलिस हेड कॉन्स्टेबल या पदावर काम करत होतो. गुन्हा रजिस्टर नंबर ६०/२०२० चा तपास माझ्याकडे आला होता. सदरचा गुन्हा भा.द.वी. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये नोंद होता. तपास माझ्याकडे आला तेव्हा मला तपास फिर्याद आणि एफ.आय.आर. इत्यादी कागदपत्रे माझ्याकडे देण्यात आली होती.

२. सदर गुन्हयाचा तपास माझ्याकडे आल्यानंतर मी घटनास्थळावर जावून दोन पंचांच्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला होता. (आता मला प्रस्तुत कामातील निशाणी २८ वरील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला) तो पंचनामा मी केलेला आहे. त्यावर माझी सही आहे. तसेच दोन पंचांच्या सहया आहेत. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. घटना ठिकाण फत्तेवाडी शिवारात सर्वे नंबर ३१ मधील शेतात, आंब्याच्या झाडाखाली होते. घटना ठिकाण फिर्यादीने दाखवले. घटना ठिकाणावर फिर्यादीने त्याला मारहाण करण्यासाठी वापरलेल्या काठ्या होत्या. त्या दाखवल्या. त्या काठ्या मी घटनास्थळावरुन दोन पंचांच्यासमक्ष जप्त केल्या होत्या. त्या काठ्या दाखवल्यास मी ओळखु शकतो. (आता मला

एम.आर. नंबर ६०/२०२६ वरील दोन जप्त काठ्या दाखवण्यात आल्या.) त्या काठ्या मी घटना ठिकाणावरुन जप्त केलेल्या काठ्या आहेत.

३. मी प्रस्तूत गुन्हयातील साक्षीदाराचे तपास टिपन नोंदवले होते. तपासामध्ये आरोपी क्र.१ व २ यांनी आपसात संगणमत करुन मोटारची वायर चोरली या कारणावरुन फिर्यादीला काठ्या व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली असे निष्पन्न झाले होते. म्हणूण मी प्रस्तूत आरोपींविरुध दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपींना ओळखतो. ते आज रोजी न्यायालयात हजर आहेत.

**उलटतपास आरोपी क्र.१ व २ तर्फे अॅड.एम.आर.जगताप यांच्यामार्फेत शपथेवर सुरु–**

४. घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी मी तपास आल्यानंतर दुस–या दिवशी गेलो. पंच बुटकुळ गावातील बोलवले होते. पंचांचे ओळखपत्र मी घेतले नव्हते. घटना ठिकाणी असलेले आंब्याचे झाड धु–यावर होते. ते झाड पुष्पाबाई शिवाजी सुर्यवंशी यांच्या मालकीचे होते. मी फिर्यादीचा पुरवणी जबाब नोंदवला होता. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने घटना ठिकाण आंब्याच्या झाडाखाली होते हे दाखवले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने जप्त केलेल्या काठ्या मारहाणी करता वापरल्याचे आणि त्या काठ्या घटना ठिकाणी पडल्याचे मला दाखवले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने घरातून काठ्या आणुन दिल्या होत्या. मी फिर्यादीचे कपडे जप्त केले नव्हते. फिर्यादीने मला कपडे दाखवले नाहीत.

५. मी कमलबाई श्रीमंत सुर्यवंशी यांचा जबाब नोंदवला होता. ''सतीशने मला ढकलुन देऊन लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन तुला ठार करतो अशी जिवे मारण्याची धमकी

दिली हे मी पोलिसांना जबाब देताना सांगितले होते. माझ्या पतीला उपचाराकरीता निलंगा येथील सरकारी दवाखाण्यात डोक्याला टाके घातले व सिटीस्कॅन करीता लातूर येथील सरकारी दवाखान्यामध्ये पाठवले'' हे मला कमलबाईने जबाब देताना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी घटना स्थळावर जाऊन पंचनामा केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मला तपासामध्ये कोणत्याही साक्षीदाराने घटना घडल्याचे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी दोन काठ्या घटनास्थळावरुन जप्त केल्या असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन मी खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

GUNJAVATE APARNA SHIVAJI
Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2026.07.28 15:58:58 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक–२८/०७/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,
निलंगा